## संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती
## नवसंजीवन शिक्षण प्रसारक मंडळ दारव्हा व्दारा संचालित,
# कला व वाणिज्य महाविद्यालय, बोरी अरब

---

### रासेयोच्या वतीने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती साजरी
### दिनांक ०३ जानेवारी, २०२२

---

राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दिनांक ०३ जानेवारी २०२२ रोजी क्रांतीज्याती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्ताने मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख अतिथी व मार्गदर्शक म्हणून राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. रामचंद्र बुटले हे उपस्थित होते. तर प्रमुख उपस्थितीत डॉ. असरार खान आय.क्यू.ए.सी. समन्वयक, डॉ. दीपक कुटे हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे वाणिज्य विभागप्रमुख डॉ. सुनील ढेरे यांनी भुषविले.

आपल्या मार्गदर्शनपर भाषणामध्ये डॉ. रामचंद्र बुटले यांनी मनुष्यत्वासाठी शिक्षण हा मूलभूत विचार सव्वाशे वर्षापूर्वी मांडणाऱ्या सावित्रीबाई फुले हया भारतातील थोर शिक्षणतज्ज्ञ होत. लोकांना माणूस बनविणे, स्वत्व जपण्यास शिकविणे, असा व्यापक दृष्टिकोन सावित्रीबाईच्या ठिकाणी होता अशाप्रकारचे विचार व्यक्त करून क्रांतीज्योती सावित्रीबाईंच्या कार्याला उजाळा दिला. तर अध्यक्षीय भाषणामध्ये डॉ. सुनील ढेरे यांनी भारतातील पहिल्या शिक्षिका-स्त्रीमुक्ती चळवळीच्या पहिल्या नेत्या, पददलितांच्या कैवारी आणि प्रौढ शिक्षणाच्या पुरस्कर्त्या म्हणून क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे महत्त्व विशद केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम आधिकारी प्रा. डॉ. नंदकुमार भाकरे यांनी केले. तर सूत्रसंचालन कु. प्रियंका राठोड बी. भाग. २, तर आभारप्रदर्शन कु. साक्षी पाटील बी. ए.भाग.२ या विद्यार्थीनीने केले. या कार्यक्रमाकरिता डॉ. विकास निंघोट, डॉ. गणेश पवार, डॉ. विजय खोब्रागडे, प्रा. अतुलकुमार सारडे, प्रा. प्रकाश तेलगोटे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन रासेयो स्वयंसेवक वैभव इंगोले, पवन निनावे, विक्रम धकाते, कु. प्रज्ञा खोब्रागडे, कु. संजीवनी घुगे, कु. पल्लवी महल्ले, प्रतिक खाडे, ऋषिकेश पवार, विजय ठवरे या विद्यार्थ्यांनी केले.










